



www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे



**श्री अनंत चतुर्दशी**

**निमित्त हार्दिक शुभेच्छा** –संपादक

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक १२ • Title - Code :- MAHMAR4951 • गुरुवार दि.२८ सप्टेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


# आज बाप्पा घेणार निरोप ; गणेश विसर्जन गणेश भक्तांनी शांततेत साजरे करावे

**वरोरा । प्रतिनिधी**

मंगळवार १९ सप्टेंबरला गणेश चतुर्थी ते गुरुवार २८ सप्टेंबर अनंत चतुर्दशीपर्यंत गणेशोत्सव साजरा केला जात आहे. गणेशोत्सवाचा आज दहावा दिवस आहे. गणेश विसर्जन अनंत चतुर्दशीला करतात. पण काहीजण दीड, दोन, पाच, सात दिवसच गणेशोत्सव साजरा करतात.

गणपती विसर्जन पाण्यातच का केले जाते या मागे काही धार्मिक करणे आहेत. तसेच हिंदू धर्मात अनेक विधी हे निसर्गाशी निगडीत आहे. निसर्गाशी एकरूपता राखण्याचा संदेश वेगवेगळ्या पद्धतीने कायमच दिला जातो. गणपती विसजनांच्या बाबतीतही असेच आहे.बऱ्याच लोकांना वाटते की, गणेशाची प्राणप्रतिष्ठापना फक्त चतुर्थीलाच होते, तर तसे नाही. काही ठिकाणी प्रतिप्रदेला गणरायाची प्राणप्रतिष्ठापना केली जाते. प्रतिपदेपासून दशमीपर्यंत असे १० दिवस हा उत्सव साजरा केला जातो. काही ठिकाणी गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत असे १० दिवस गणेशोत्सव साजरा होतो. गणपतीची प्राणप्रतिष्ठापना केल्यानंतर त्याची पूजा करून विसर्जन करण्याचे हे



व्रत एक किंवा दीड दिवसाचे आहे. पण, उत्सवात आणखी रंगत आणण्यासाठी किंवा कित्येक जण नवस पूर्ण करण्यासाठी पाच दिवस, सात दिवसांनी गणेशमूर्तीचे विसर्जन करतात. त्यामागे कोणतेही शास्त्रीय कारण नाही. गणेशभक्त आपल्या हौसेनुसार गणेशमूर्तीचे विसर्जन पाचव्या किंवा सातव्या किंवा दहाव्या दिवशी करतात असेही सांगितले जाते.

ज्यावेळी महर्षी व्यास महाभारताची निर्मिती करत होते त्यावेळी गणपती बाप्पा लेखनिकाची भूमिका बजावत होते. महाभारत लिहिण्याचे काम हे दहा दिवस अविरतपणे चालू होते. त्यामुळे गणपती बाप्पांनी शरीर गरम न व्हावे म्हणून अंगाला माती लिंपल्याचे सांगितले जाते. हा गणपती बाप्पांचा विशेष अवतार असल्यामुळे त्यांना दहा दिवसानंतर जलसमाधी देतात अशी वंदता आहे. कदाचित या दहा दिवसात बाप्पाची ऊर्जा टिकून राहावी म्हणून नैवैद्यासाठी गोडधोड, मोदक वगैरे करण्याची परंपरा आहे.अहोरात्र लिहिण्याच्या कामामुळे शरीर उष्ण झाल्यामुळे पाण्यात डुबकी मारल्याविना गत्यंतर नव्हती असेही अख्यायिका आहे. त्यामुळे गणपतीचे विसर्जन अनंत चतुर्दशीच्या दिवशी करतात.गणपती विसर्जनाशी निगडीत अनेक गोष्टी आहेत. त्यापैकी एक म्हणजेच गणपतीला जल तत्वांचा अधिपती मानलं जातं. त्यांच्या विसर्जनाचं मुख्य कारण तर हेच आहे की, अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपतीची पूजा-अर्चा करून त्यांना पुन्हा पाण्यात विसर्जित केलं जातं. म्हणजेच ते ज्याचे अधिपती आहेत तिथे त्यांना पोहोचवलं जातं.निसर्गाच्या प्रत्येकच गोष्टीचे एक चक्र आहे. ज्या गोष्टीची सुरवात होते तिचा शेवट हा नक्कीच होतो. निसर्गाचा हा कालचक्राचा नियम गणेश विसर्जनातून दिसून येतो. निसर्गाच्या अंशापासून गणपतीची मूर्ती तयार होते आणि शेवटी निसर्गतःच ती विलीन होते. गणेश विसर्जनाच्या वेळेस विसर्जन हे फक्त मूर्तीचेच करायचे नसते तर आपल्यातील दुर्गुणांचेसुद्धा करायचे असते.

## शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्याकडून विद्यार्थीनी करिता आर्थिक मदत

**भद्रावती । प्रतिनिधी**

येथील प्रेरणा डोंगरे या विद्यार्थीनीची स्त्री सहाय्यिका परिचारिका (एएनएम) प्रशिक्षणाकरिता निवड करण्यात आली. मात्र वडिलांची आर्थिक परिस्थिती ठिक नसल्यामुळे प्रशिक्षणाच्या पुढिल खर्चासाठी शिवसेना (उबाठा) गटाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्याकडून विद्यार्थीनीकरिता आर्थिक मदत करण्यात आली.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारणा प्रेरित होऊन पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात शिवसेनेचे चंद्रपूर जिल्हा प्रमुख मुकेश जीवतोडे नेहमीच समाजोपयोगी कार्य करत असतात. यामध्ये विद्यार्थांना शैक्षणिक मदत, रुग्णांना आरोग्य विषयी मदत, दिव्यांग व्यक्तींना मदत तसेच समाजातील दुर्बल घटकांपर्यंत मदत पोहविण्यासाठी नेहमी तत्पर असतात.



परिचारिका प्रशिक्षण स्कूल सामान्य रुग्णालय चंद्रपूर येथे सन २०२३-२४ ला सुरू होर्णाय़ा २ वर्षीय कालावधीच्या स्त्री सहाय्यिका परिचारिका प्रसाविका (एएनएम) प्रशिक्षणाकरिता भद्रावती येथील प्रेरणा डोंगरे हिची निवड करण्यात आली. परिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. मात्र प्रशिक्षणासाठी लागर्णाय़ा खर्चामुळे वडिलांसमोर चिंता निर्माण झाली. शिवसेना (उबाठा) गटाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्यापर्यंत ही बातमी पोहोचताच, त्यांनी प्रेरणाच्या वडिलांची भेट घेत आर्थिक सहाय्य केले. यावेळी शहर प्रमुख संदीप मेश्राम, शहर संघटक तथा माजी नगरसेवक किशोर टिपले, युवासेना समन्वयक तथा माजी नगरसेवक दिनेश यादव, उपतालुका प्रमुख सागर पिंपलशेंडे, शिवदुत मनीष ठक व आदी शिवसैनिक उपस्थिती होते.

## खासदार अशोक नेते यांच्या हस्ते भव्य रक्तदान व आरोग्य तपासणी शिबीरांचे उद्घाटन संपन्न

**गडचिरोली । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी गडचिरोली शहर शक्तीकेंद्र यांच्या वतीने देशाचे लाडके लोकप्रिय पंतप्रधान मान.नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सेवा पंधरवाडा या कार्यक्रमा निमित्त भव्य रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर तथा नमो प्रदर्शनी,आयुष्यमान भारत कार्ड व आभा कार्ड नोंदणी वाटपाचा कार्यक्रम लांझेडा, इंदिरानगर येथे बाल गणेश मंडळा जवळ आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमा निमित्ताने खासदार अशोक नेते यांनी दीपप्रज्वलन करुन गणपती बाप्पा चे दर्शन घेत शहरातील लांझेडा,इंदिरानगर येथे भव्य रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिरांचे उद्घाटन खासदार अशोकजी नेते यांच्या हस्ते करून स्वतः शुगर बीपी तपासून शुभारंभ करून यांचा शिबिरांचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ असे आवाहन खासदार अशोक नेते यांनी याप्रसंगी केले. या निमित्त जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे यांनी सुद्धा बीपी



शुगर तपासणी केली.यावेळी प्रामुख्याने खासदार तथा राष्ट्रीय महामंत्री भाजपा अनु. जनजाती मोर्चा चे अशोक नेते,जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे, जिल्हा महामंत्री गोविंद सारडा, जिल्हा महामंत्री प्रकाश गेडाम, जेष्ठ नेते रमेश भुरसे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अनिल तिडके,ओबीसी मोर्चा चे जिल्हाध्यक्ष अनिल पोहणकर, माजी न.प.उपाध्यक्ष अनिल कुनघाडकर,शहर महामंत्री विनोद देओजवार,शहर महामंत्री हर्षल गेडाम,भाजपाचे श्याम वाढई, नरेश हजारे,कान्होजी लोहंबरे, तसेच मोठया संख्येनी भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते,व इंदिरानगरातील बाल गणेश मंडळाचे सदस्यगण उपस्थित होते.

**झाडे लावा झाडे जगवा**

### सुट्टीची सूचना

आज गणेश विसर्जन असल्यामुळे दै.सह्याद्रीचा राखणदार कार्यालयास सुटी असल्यामुळे दी.२९ सप्टेंबर रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी. – व्यवस्थापक

### शब्द वेध

**महिला आरक्षण...**

बरे झाले ! हे एक असेच
मागे होते राहून गेले....
आता ताई ,बाई ,अक्का
यांचे आरक्षण आता पक्के झाले !
आता तर पुरुषांची मक्तेदारी
कशी म्हणून ती चालणार नाही..!
गल्ली असो वा असो दिल्ली...
बोलणार फक्त महिलाच !
आता पुरुषांचे कसे ?त्यांचे तर
महिलांसमोर काडीचेही
चालणार नाही...!!



सुभाष उसेवार
९०११२६२४३९

## गोंडवाना विद्यापीठातील रासेयो कार्यक्रम अधीकारी व रासेयो स्वयंसेविका यांना राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

## एकाच वेळेस दोन पुरस्कार पटकावणारे गोंडवाना विद्यापीठ महाराष्ट्रातले पाहिले विद्यापीठ

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत असलेले केवळरामजी हरडे महाविद्यालय, चामोर्शी येथील रासेयो कार्यक्रम अधिकारी व विभागीय समन्वयक डॉ. पवन नाईक व याच महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेविका जानव्ही पेद्दीवार यांना सन २०२१-२२ चा राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला. युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय , राष्ट्रीय सेवा योजना विभाग भारत सरकार व्दारा राष्ट्रीय सेवा योजनेतील उत्कृष्ठ काम करण्यासाठी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार व उत्कृष्ठ स्वंसेविका पुरस्कार नुकताच गोंडवाना विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या अंतर्गत असलेले कार्यक्रम अधिकारी डॉ. पवन नाईक यांची निवड झाली तर राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ठ रासेयो स्वयंसेवीका म्हणुन सुध्दा गोंडवाना विद्यापीठातिल राष्ट्रीय सेवा



योजना अंतर्गत असलेली स्वयंसेविका जानव्ही विजय पेदीवार हीची निवड झाली. महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथम एकाच वेळी रासेयोचे दोन राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त करणारे पहले विद्यापीठ म्हणुन गोंडवाना विद्यापीठाला मान मीळाला. डॉ. पवन नाईक व जानव्ही पेद्दीवार यांच्या राष्ट्रीय स्तरावरील निवडीमुळे गोंडवाना विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संपुर्ण महाराष्ट्रात अभिनंदन होत आहे. महामहिम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते दिल्ली येथे राष्ट्रपती भवनामध्ये २९ तारखेला या दोघांचाही सत्कार व सन्मान करण्यात येणार आहे. समाजाप्रती करण्यात आलेले या दोघांचेही कार्य संपूर्ण गडचिरोली जिल्हातच नाही तर महाराष्ट्रात देखील यांनी आपल्या कार्याची छाप सोडलेली आहे. आजपर्यंत महाराष्ट्राच्या इतिहासात असे कधीच घडले नाही आहे की एकाच विद्यापीठातील रासेयो कार्यक्रम अधिकारी आणि रासेयो स्वयंसेविका यांना राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळाला असेल जे या वेळेस घडून आलेले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पुरस्काराकरिता एक कार्यक्रम अधिकारी आणि दोन रासेयो स्वयंसेवक यांची निवड करण्यात आलेली आहे. दुसरा स्वयंसेवक हा औरंगाबाद येथील महाविद्यालयातील आहे.गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे , प्र-कुलगुरु डॉ.श्रीराम कावळे , कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांनी सुध्दा राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. पवन नाईक व रासेयो स्वयंसेवीका जानव्ही पेद्दीवार व रासेयो संचालक डॉ. श्याम खंडारे तसेच गोंडवाना विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संपूर्ण चमूचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

## चंद्रपुरात प्रवासी भरलेला ऑटोला भीषण अपघात



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शहरातील बायपास मार्गावरील जुनोना चौकाकडून बंगाली कॅम्पकडे येणाऱ्या ऑटोला अपघात झाला. यामध्ये ४ जण ठार झाल्याचा अंदाज आहे. मात्र, ३ जण जखमी झाल्याची माहिती आहे. जुनोना चौकातून बंगाली कॅम्पकडे येणारा आटो खड्डा वाचविण्याच्या प्रयत्नात दुसऱ्या वाहनाला आदळला.जुनोना चौकातून ६ प्रवासी घेऊन ऑटो चालक बंगाली कॅम्पकडे निघाला होता. या मार्गावरील बिएनआर पूलावर खड्डा चुकवण्याच्या प्रयत्नामध्ये ऑटो चालकाने वळण घेतले. याचवेळी समोरून आलेल्या दुसऱ्या वाहनाला ऑटो जाऊन धडकला. या घटनेमध्ये मोठ्या प्रमाणात दुखापत झाली. रात्री साडेसातच्या सुमारास ही घटना घडली. प्राथमिक माहितीनुसार, ४ जण ठार झाल्याची आणि ३ जण जखमी झाल्याची माहिती आहे. जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून अधिक तपास सुरू केला आहे.

# सर्जनशील लोकप्रतिनिधी




आपला भारत विविध जातीप्रधान देश आहे. इथे गुणवत्तेपेक्षा जातीपातीला जास्त महत्त्व आहे की काय असे दिसून येते. एकीकडे आम्ही भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे म्हणून अभिमानाने सांगतो. आणि दुसरीकडे शासकीय कागदपत्रांवर जातीचा उल्लेख करणे अनिवार्य करतो. आम्ही जाती तोडायला निघालो की जोडायला? हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. पूर्वीची मंडळी जितकं जातीपातीला महत्त्व द्यायची अलीकडे ते महत्त्व युवापिढी देताना दिसत नाही. सर्वत्र शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार झाल्यामुळे शिक्षण घेताना अनेकांच्या डोक्यात जात हा विषयच नसतो. विद्यार्थी जीवनात सर्वांना जात-पात, धर्म विसरून एकमेकाशी गुण्यागोविंदाने वागायचे असते. युवा वयच असे आहे की जसे त्यांच्यावर संस्कार होईल त्याप्रमाणे ते घडत जाते. सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रवाद हा हेतू समोर ठेवून शिक्षण दिले जाते. त्याप्रमाणे शैक्षणिक धोरणांची आखणी केली जाते. परंतु शासकीय धोरणे लक्षात घेता असे वाटते की, ज्यांना जात विसरायची आहे त्यांनाही जोरजबरदस्तीने जात आठवायला लावते. विशेषतः निवडणुका आल्या की राजकारणी जातीपातीला आवश्यकतेपेक्षा जास्त महत्त्व देतात. एकीकडे जात-पात विसरा अशी भाषणे ठोकायची आणि दुसरीकडे जाती व्यवस्था कशी भक्कम होईल यासाठी वातावरण निर्माण करायचे. राजकीय पक्षांचे दोगलेपण लक्षात घेणे आवश्यक झाले आहे.ज्या मतदारसंघांमध्ये ज्या जातीचे मोठ्या प्रमाणात प्राबल्य असेल, जी जात संख्येने मोठी आहे. त्या जातीच्या उमेदवाराला राजकीय पक्ष आपल्या पक्षाची उमेदवारी जाहीर करतात. हे असे जर चालत राहिले तर छोट्या जातीच्या लोकांनी काय करायचे? देशाच्या भवितव्याची धुरा ज्या राजकारण्याच्या हातांमध्ये आहे हे राजकारणीच जर असे जातीपातीला महत्त्व देणार असतील, प्रोत्साहन देत असतील तर त्या देशाचे भवितव्य काय? इकडे मानव चंद्रावर गेला. आपली भौतिक प्रगती झाली. हजारो नव्हे तर लाखो किलोमीटर अंतरावरील माणसे एकमेकांशी संवाद साधू शकतात. बोलू शकतात, दिसू शकतात. सर्वत्र विश्वधर्म वृद्धिंगत होत चालला आहे. माणसे जातीच्याच नव्हे तर देशाच्या सीमा ओलांडून अन्य देशांशी सुसंवाद साधत आहे. एकमेकांच्या हातात हात घालून परस्परांच्या सहकार्याने प्रगतीच्या आणि विकासाच्या दिशेने झेप घेण्याचा प्रयत्न करत आहे. दुसरीकडे आमचे राजकारणी स्वयंकेंद्री होऊन जातीपातीच्या भिंती रूदावून आपले उखळ पांढरे करून घेत आहेत. ही अतिशय लज्जास्पद बाब आहे. सगळे बघून लाज वाटते. खरं म्हणजे निवडणुका गुणवत्तेच्या जोरावर लढल्या गेल्या पाहिजे. परंतु दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही.आपल्याकडे गुणवत्तेपेक्षा, त्या उमेदवारातील लोकोपयोगी बाजू लक्षात घेण्यापेक्षा जात आणि धनाढ्य, पैसेवाल्यांना महत्त्व आले आहे. असे जर प्रमाण राहिले तर पुढे सर्वसामान्य माणसाला, गरिबांना, आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांना राजकारणात टिकणे कठीण जाईल. लोकशाहीमध्ये सहभाग वाढविण्यासाठी युवकांचा मतदार यादीमध्ये समावेश केला जातो. अनिवार्य वय प्राप्त विद्यार्थ्यांनी, युवकांनी मतदार यादीत नाव नोंदवावे यासाठी शासन आपल्या स्तरावर प्रयत्न करतो. अनेक नवमतदार यातून निर्माण होतात.तरूण वय हे जोशाचे वय असते. स्वप्नांचे वय असते. नीतिमत्ता जोपासण्याचे वय असते. व्यावहारिक जीवनातील खाचखळगे माहीत नसल्याने ही युवा पिढी तत्त्ववादाला विशेष महत्त्व देते. तरुण तत्ववादी भूमिका घेऊन मतदार करू शकतात. परंतु राजकीय मंडळी या कोवळ्या मनांवर जातीचे धर्माचे विषाणू सोडून त्याचे मन बधीर करून टाकतात. त्यामुळे निकोप मतदार व नागरिक निर्माण होऊ शकत नाही. पुस्तकातले शिक्षण पुस्तकातच बंदिस्त राहते.विद्यार्थी जीवनातील कोवळ्या वयात जर हे जातीपातीचे संस्कार होणार असेल तर पुढे कसे होईल. जाती-पाती पेक्षा कर्म महत्त्वाचे आहे. माणसाने कुठल्या जातीत जन्म घ्यावा हे आपल्या हातात नाही. मात्र कर्म करणे आपल्या हातामध्ये आहे. म्हणून लोकहितार्थ जगण्याचा दावा करणाऱ्या शासनाने, प्रशासनाने निदान जातीपातीपेक्षा गुणवत्तेला महत्त्व देण्याचा प्रयत्न करणे अपेक्षित आहे. तेच निकोप लोकशाही आणि मानवतेचे लक्षण आहे. परंतु दुर्दैवाने आपल्याकडे असे होताना दिसत नाही.निरक्षर लोकांपेक्षा शिकले सवरले लोकच जास्त जातीयवादी असतात असे अनेकांना वाटते. सर्वसामान्य माणसांपेक्षा पांढरे कपडे घालणारे ढोंगी बगळे जातीपातीला विशेष प्राधान्य देतात. स्वतःचे उखळ पांढरे करण्यासाठी व स्वार्थ साधण्यासाठी रचलेले हे षडयंत्र देशप्रेमी सर्वसामान्य समाजप्रेमी नागरिकांनी समजून घ्यायला पाहिजे. निदान युवा पिढीने तरी त्यांच्या या घाणेरड्या डावपेचाला बळी पडायला नको. निकोप लोकशाही जर टिकवायची असेल तर आता युवा पिढीला समोर आल्याशिवाय पर्याय नाही. ज्या देशातील युवक संघटित होतात. ज्या देशातील युवक विचार करतात. ज्या देशातील युवक सतत सत्याची पाठराखण करतात. ज्या देशातील युवक स्वतःच्या डोक्यांनी स्वतःच्या भल्याचा विचार करतात. आपली सदसदविवेकबुद्धी गहाण ठेवत नाही. त्या देशाला कोणीही मागे टाकू शकत नाही. युवकांनी राजकारणी लोकांचे धूर्त हेतू ओळखले पाहिजे आणि आपले लोकशाही बळकट करण्यासाठी धनाढ्य ,गब्बर यांना निवडून देण्यापेक्षा ज्यांच्यामध्ये गुणवत्ता आहे अशा गरीब लोकांना निवडून दिले पाहिजे. धनाड्य राजकारण्यांच्या चमच्यांपासून स्वतःला सावरले पाहिजे. मतदान पेटीत सत्याची पाठराखण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जर राजकीय लोकांच्या धूर्तपणाला सर्वसामान्य युवक वर्ग बळी पडणार असेल तर ते दुःखद आहे. केवळ पैशाच्या जोरावर श्रीमंतच जर सभागृहात जाणार असेल तर लोकशाही खऱ्या अर्थाने टिकणार नाही. पुढे स्थानिक स्वराज्य संस्थांपासून देशपातळीवर सगळे गब्बर श्रीमंत लोकच जाऊन बसतील. गरीब अधिक गरीब व श्रीमंत अधिक श्रीमंत होत जातील. गरिबांचा वाली कोणीही उरणार नाही? लक्षात ठेवा. गरिबांचा विचार गरीबच करू शकतो. श्रीमंत करू शकत नाही. युवकांनी गरिबांच्या बाजूने उभे राहायचे की श्रीमंताच्या याचा विचार केला पाहिजे. देशातील अलीकडे महागाई बघता गरिबांचे जिणे दुष्कर होऊन गेले आहे. एकीकडे आपण महागाच्या नावाने रोष व्यक्त करतो आणि दुसरीकडे त्या महागाईचा पुरस्कार करणाऱ्या व्यवस्थेचे समर्थन करतो. असेच जर चालत राहिले तर महागाईचा वनवा पेटल्याशिवाय राहणार नाही. हा वनवा एक दिवस गरिबांना गिळून टाकेल. महागाईच्या जमान्यात सर्वसामान्य माणसांचे जगणे दुष्काळ होऊन जाईल. भविष्य अंधकारमय होईल.उदाहरणार्थ साधा गॅस सिलेंडर घ्यायचा म्हटलं तरी घरच्या माणसाला दहादा विचार करावा लागतो. शासनाला जर पैसे कमवायचेच आहे तर इतर अनेक मार्ग उपलब्ध आहे. ज्या गरिबांच्या प्राथमिक गरजा आहे निदान त्याचे भाव तरी नियंत्रणात असायला पाहिजे. परंतु याची जाणीव असण्यासाठी लोकप्रतिनिधी स्वतः गरीब असणे आवश्यक आहे. नेतृत्व गरीब असणे आवश्यक आहे. तुमचे नेते पुढारी गरीब असणे आवश्यक आहे. गरीब नसेल तरीही गरीबीची जाण असणे आवश्यक आहे.तुमचे नेतृत्व श्रीमंत असेल तर त्यांना गरिबाची जाणीव काय असणार? गरीब आणि गरीबीची जाणीव असण्यासाठी स्वतः पोटात भुकेची कळ सोसावी लागते. म्हणून गरिबांचा विचार करणारी यंत्रणा कशी अमलात आणता येईल याचा प्राधान्याने विचार करणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्ये आहे. गरिबांसाठीच्या मानवतावादी दिशेने प्रवास करण्यासाठी निवडणुका हे माध्यम आहे. मतपेटीच्या माध्यमातून परिवर्तन घडत असते. आपण कधी प्रयत्न करणार आहोत? मावळतीचा सूर्य उगवतीकडे नेण्यासाठी युवकांनी पुढाकार घेतला तरच हे सारे शक्य आहे.

## मुरखळा (माल ) गाव विकासासाठी निधी देण्याची मागणी

### आ.डॉ.देवराव होळी यांना निवेदन



**चामोर्शी | प्रतिनिधी**

तालुक्यातील मुरखळा (माल )हे गाव परिसरात मोठे असून नऊ सदस्य संख्या असलेली ग्रामपंचायत आहे. गावाची लोकसंख्या तीन हजारच्या आसपास असून गावातील समस्या सोडवण्यासाठी ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी २७ सप्टेंबर रोजी आ.डॉ. देवराव होळी यांना निवेदन देऊन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी केली आहे.निवेदनात म्हटले की , गावातील अनेक विकासकामे निधी अभावी झाली नसल्याने गाव विकास करण्यासाठी मोठी अडचण निर्माण झाली आहे. गावातील मूलभूत समस्यासह गावातील इतर समस्या सोडवण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याने आपल्या स्थानिक विकास निधीतून तत्काळ निधी उपलब्ध करून द्याल या मागणीचे निवेदन ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी दिले आहे. मुरखळा (माल ) गावाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन उपस्थित पदाधिकारी यांना आ. डॉ. देवराव होळी यांनी दिले .निवेदन देतेवेळी उपसरपंच लक्ष्मी सालोरकर , ग्रामपंचायत सदस्य योगीराज बुरे , अर्चना नैताम , पुष्पा गव्हारे , संदीप गटलेवार , सोमनाथ सालोरकर , ग्रामविकास अधिकारी यादव मुळे उपस्थित होते.

# आक्रमक बचाव!

प्रस्थापितविरोधी जनभावनेचा मुद्दा आपल्या विरोधात जाऊ नये, यादृष्टीने भारतीय जनता पक्ष रणनीती आखताना दिसत आहे. मोदींचे भाषण हे त्याचे एक ठळक उदाहरण आहे.देशातील राजकीय इतिहासावर नजर टाकली तर आपल्याकडील निवडणुकांमध्ये प्रस्थापितविरोधाची भावना अर्थात 'अँटिइन्कबन्सी' हा घटक हमखास दिसतो. त्याच्या तीव्रतेत कमी-जास्त फरक पडत असेल; परंतु त्याचे अस्तित्व जाणवल्याशिवाय राहात नाही. वेगवेगळ्या कारणांनी साचलेल्या असंतोषाचा फटका सत्तेत बसलेल्या प्रस्थापितांना बसतो. १९७७, १९८९, २००४ आणि २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये त्याचा सर्वात ठळक प्रत्यय आला. (लोकल ते ग्लोबल लेटेस्ट अपडेट मिळवा सकाळच्या व्हॉट्सअप चॅनेलवर... फॉलो करण्यासाठी या लिंकवर करा क्लिक)अनेक राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचा आढावा घेतला तरी हा प्रवाह अगदी स्पष्टपणे दिसतो. हा इतिहास आठवण्याचे कारण अर्थातच निवडणुकांचे वाजू लागलेले पडघम आणि आगामी निवडणुकांमध्ये उपस्थित होणारे प्रश्न. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भोपाळ आणि जयपूरमधील सभांमधून काँग्रेसवर घणाघाती टीका केली.राजस्थानात काँग्रेसची सत्ता हटवून भाजप ती मिळवू पाहात आहे; मध्य प्रदेशातील टिकवू पाहात आहे. मध्य प्रदेशात काँग्रेसचा दोन वर्षांचा कार्यकाळ वगळता भारतीय जनता पक्षाचे तब्बल वीस वर्षे सरकार सत्तेवर आहे आणि आता पुन्हा लोकांना सामोरे जाताना प्रस्थापितविरोधी जनभावनेचा सामना त्या पक्षाला करावा लागणार हे स्पष्ट आहे. युद्धनीतीत आक्रमण हाच बचावाचा सर्वात चांगला मार्ग, असे एक सूत्र सांगितले जाते.मोदींनी तेच मध्य प्रदेशातील प्रचारात अवलंबलेले दिसते. त्यामुळेच राजधानी भोपाळच्या सभेत त्यांनी काँग्रेस पक्षावर घणाघात



करताना काहीच हातचे राखून ठेवलेले नाही. त्यांनी निवडलेले मुद्दे लक्षात घेतले तर सत्तेत असूनही अद्यापही आपण 'अँटिएस्टॅब्लिशमेंट' आहोत, हे ठसवू पाहाताहेत. त्यामुळेच १९७१ च्या गरीबी हटाव घोषणेची ते आठवण काढतात.पन्नास वर्षांत काँग्रेसने गरीबी हटविण्यासाठी काहीही केले नाही, उलट ती वाढवली, असा आरोप करतात. हा पक्ष गंजलेल्या लोखंडासारखा असून, मुळात पक्ष नेत्यांच्या हातात राहिलेला नाही. तो आउटसोर्स केलेला पक्ष आहे. शहरी नक्षलवाद्यांनी तो ताब्यात घेतलेला आहे, असाही गंभीर स्वरूपाचा ठपका ते काँग्रेसवर ठेवतात.मध्य प्रदेशातील सध्या विशीत असलेल्या तरुणांचा उल्लेख करून त्यांनी अद्याप काँग्रेसची राजवट कशी असते, हे पाहिलेलेही नाही, हा मोदींनी मांडलेला मुद्दाही यासंदर्भात बराच बोलका आहे. या तरुणांच्या बाबतीत पक्षाला जास्त प्रयत्न करावे लागतील, हाही एक संदेश ते आपल्या कार्यकर्त्यांना देऊ पाहात असावेत.मध्य प्रदेशातील जनतेचे मूलभूत प्रश्न, विशेषतः राज्य सरकारच्या अखत्यारीत येणारे विषय, राज्य सरकारची कारभारशैली आणि कामगिरी यावर भर न देता काळ आणि व्याप्ती या दोन्ही दृष्टिकोनातून ते मध्य प्रदेशची चौकट ओलांडण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसते.महिला आरक्षण विधेयक आणि सनातन धर्म हे विषयही ते निवडणूक प्रचाराचा विषय करणार हेही त्यांच्या भाषणावरून स्पष्ट झाले आहे. अर्थात प्रमुख प्रतिस्पर्धी म्हणून समोर काँग्रेस पक्ष असतो, तेव्हा अशा प्रकारचे डावपेच राबवणे भाजपला सोपे जाते, हेही अनेकदा जाणवले आहे.कर्नाटकात निवडणूक झाली, तेव्हा प्रामुख्याने राज्याच्या प्रश्नांभोवती प्रचार केंद्रित करून काँग्रेसने भाजपच्या, विशेषतः मोदी यांच्या अशाच प्रकारच्या रणनीतीला चोख उत्तर दिले होते. आता तो पक्ष मध्य प्रदेशात कशी लढत देतो, ते पाहायचे. सुरवातीला तरी मोदींनी प्रचाराची दिशा ठरविण्याचा प्रयत्न केला आहे.भाजप नेतृत्वाला विशेषतः मोदी-शहा यांना निवडणुकीतील प्रस्थापितविरोधी जनभावनेचा मुद्दा चांगलाच माहीत आहे. त्यामुळेच गुजरातेत वेगळी व्यूहरचना त्यांनी केली होती. प्रस्थापितविरोधासाठी विरोधकांकडे कशाला पाहता, आम्हीच तुम्हाला तो पर्याय देतो, असा संदेश देत पक्षातील प्रस्थापितांना घरी बसवून आपलीच नवी टीम त्यांनी त्या राज्यात उतरवली होती. कर्नाटकातही त्याचीच केलेली पुनरावृत्ती मात्र महागात पडली, हेही तितकेच खरे.मध्य प्रदेशातही त्याचीच पुनरावृत्ती केली जाते का हे पाहायचे आहे. केंद्रीय पातळीवर काम करणाऱ्या काहींना उमेदवाऱ्या देऊन त्याची झलक पक्षाने दाखवली आहे, असे म्हणता येईल. तूर्त हे स्पष्ट झाले आहे की, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीची रंगीत तालीम म्हणूनच मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, तेलंगण आणि मिझोरामच्या विधानसभा निवडणुकांकडे भाजप पाहात आहे.भाजपच्या या मोहिमेला उत्तर देण्यासाठी पर्यायी रणनीती ठरविण्यात राहुल गांधी आणि काँग्रेस पक्ष यांची कसोटी लागेल. एकीकडे विरोधी पक्षांची मोट एकत्र ठेवायची आणि दुसरीकडे भाजपला कोंडीत पकडण्यासाठी स्थानिक मुद्दे, नागरिकांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न लावून धरायचे, असा प्रयत्न करावा लागेल.उद्योगपतींना धार्जिणी धोरणे आणि जातीय जनगणना असे मुद्दे मांडून विलासपूरमधील सभेत राहुल गांधी यांनी सरकारच्या विरोधात झोड उठवली. सातत्याने ते सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करीत आहेत, हे खरेच. परंतु हे मुद्दे आजच्या काळात किती 'मतप्रभावी' ठरतील, हे पाहावे लागेल.दुसरे म्हणजे राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये त्यांच्या पक्षालाही राज्यातील 'टिइन्कबन्सीला तोंड द्यावे लागणार आहे. म्हणूनच प्रचारमोहिमेची व्यूहरचना काळजीपूर्वक आखावी लागेल. संसदीय लोकशाहीतील स्पर्धेतून लोकांच्या प्रश्नांची तड लागावी, ते ऐरणीवर यावेत, अशी अपेक्षा असते. निदान ती या निवडणुकांच्या निमित्ताने पूर्ण होईल का?

## ईद ए मिलादनिमित्त शुक्रवारी शासकीय सुटी:गणेश विसर्जन व ईद एकाच दिवशी आल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतला निर्णय

**मुंबई**-अनंत चतुर्दशी निमित्त गणेश विसर्जन आणि ईद-ए-मिलादचा सण एकाच दिवशी म्हणजे उद्या गुरुवारी (दि.२८) होणार असून गर्दी आणि मिरवणुकांचे योग्य व्यवस्थापन करणे पोलीस प्रशासनास शक्य व्हावे म्हणून शुक्रवार २९ तारखेस शासकीय सुट्टी जाहीर करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.ऑल इंडिया खिलाफत कमिटीच्या शिष्टमंडळाने यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन विनंती केली होती.राज्यात शांततेचे वातावरण असावे आणि गर्दी तसेच मिरवणुकांचे नियोजन करता येणे पोलिसांना शक्य व्हावे म्हणून २९ तारखेस सुट्टी देण्याची विनंती त्यांनी केली होती. या शिष्टमंडळात खासदार राहुल शेवाळे, आमदार अबू आझमी, आमदार रईस खान, नसीम खान, आदींचा समावेश होता.अनंत चतुर्दशीनिमित्त राज्याच्या विविध भागात गणेश विसर्जन मिरवणुका आणि ईद ए मिलादनिमित्त मिरवणुका काढण्यात येत असतात. दोन्ही सणांमुळे एकाच दिवशी निघणाऱ्या मिरवणुकांमुळे पोलीस यंत्रणांवर ताण येण्याची शक्यता लक्षात घेऊन २९ सप्टेंबरची सुट्टी जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.अनंत चतुर्दशीनिमित्त गणरायाला आपण मनोभावे निरोप देऊ. विसर्जन मिरवणुकीतही नेहमीप्रमाणे शिस्त पाळावी आणि



शांतता, सद्भावनेच्या वातावरणात गणेश विसर्जन पार पाडावे असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनीराज्यातील गणेशभक्तांना केले आहे. गेले दहा दिवस श्री गणेशाच्या आगमनाने मांगल्याचे वातावरण निर्माण झाले. येणाऱ्या काळातही ईद तसेच नवरात्री, दसरा - दिवाळीसारखे सण आहेत. सर्वांनी एकोप्याने आणि भक्तिभावाने हे सण पार पाडावे आणि राज्याची परंपरा अधिक उज्वल करावी असेही मुख्यमंत्री आपल्या संदेशात म्हणतात. गणेशोत्सवाच्या काळात पोलिसांनी संपूर्ण राज्यात कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित राहील याची काळजी घेतली तसेच एकूणच गणेश मंडळांनी देखील नियमांचे पालन करून सर्वांचा हा आवडता उत्सव आनंदाने पार पाडला त्याबद्धल मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. उत्सव साजरा करतांना आपल्याला स्वच्छतेचे महत्व डोळ्याआड करता येणार नाही. स्वच्छ महाराष्ट्राची मोहीम आपण हाती घेतली आहे. १ ऑक्टोबरला आपण आपली गावे, वॉर्ड कचरामुक्त करणार आहोत. गणेश मंडळांनी देखील विसर्जन आणि त्यानंतर आपल्या आसपासचा परिसर स्वच्छ ठेवण्यास प्रशासनाला मदत करावी आणि चांगला संदेश द्यावा असेही मुख्यमंत्र्यांनी आवाहन केले आहे.'ईद-ए-मिलादचे उत्सव पर्व सौहार्द-सलोखा घेऊन येईल. यातून परस्परांतील आदर-प्रेमभाव आणि स्नेह वाढीस लागावा,अशी मनोकामना व्यक्त करत मुख्यमंत्र्यांनी ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा दिल्या आहेत. 'प्रेषित मोहम्मद पैगंबर यांनी जगाला त्याग आणि प्रेमाचा संदेश दिला. त्यांचे जीवन हाच एक मोठा संदेश आहे. त्यातून प्रेरणा घेऊन आपण परस्पर आदर-प्रेमभाव वाढीस लावण्याचा प्रयत्न करूया,' असेही आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.


## लोकमान्य इंग्लिश मीडियम स्कूल, वरोराचा मुलींचा व्हॉलीबॉल संघ राज्यस्तरावर

### नागपूर विभाग शालेय स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात अजिंक्य



**वरोरा | प्रतिनिधी**

वर्धा येथे झालेल्या नागपूर विभागीय स्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या गटात लोक शिक्षण संस्था, वरोडा अंतर्गत येणाऱ्या लोकमान्य इंग्लिश मिडीयम स्कुल ने चंद्रपूर जिल्हाचे प्रतिनिधित्व करताना नागपूर जिल्ह्याचा २५-१८, २५-२१ असा सरळ दोन डावात पराभव करीत बोईसर जिल्हा -पालघर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय स्पर्धेकरिता पात्र ठरला आहे.विजयी संघात ईश्वरी राऊत, वैष्णवी गुंतीवार, संचिता हजारे, राशी मांडवकर, श्रावणी ताजने, ईशा बदकी, क्रिष्णा कथडे, समृद्धी पिंगे, नव्या राजूरकर, अनुराधा बोथले, तन्वी उमक, वैष्णवी मिलमीले यांचा समावेश होता. मागील वर्षी सुद्धा लोकशिक्षण संस्थेच्या मुलींच्या तिन्ही गटात राज्यस्तरावर प्रवेश प्राप्त करीत प्रविण्य मिळवले होते हे विशेष. लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत पाटील , उपाध्यक्ष श्रीकृष्ण घड्याळपाटील, कार्यवाह विश्वनाथ जोशी, ड.दुष्यंत देशपांडे, मुख्याध्यापक संजय आंबुलकर, वरोरा स्पोर्ट्स फाउंडेशनचे अध्यक्ष गजानन जिवतोडे, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, भोजराज चौधरी, संदीप उईके यांनी विजयी संघांचे अभिनंदन केले. सर्व खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय जेष्ठ मार्गदर्शक सुनील बांगडे, अनिल घुबडे, गणेश मुसळे,प्रशिक्षक निखिल बोबडे, संघ व्यवस्थापक वनश्री पालमकुलवार, दुशांत लांडगे व पालक तसेच लोकशिक्षण संस्था वरोडा यांना दिले आहे.



किल्ला वार्ड वरोरा येथील प्रा.नरेंद्र लांबट यांच्याकडील गणेशोत्सव



व्होल्टाज कॉलनी वरोरा येथील राहुल मेश्राम यांच्याकडील गणेशोत्सव





शिवाजीनगर भद्रावती येथील मोरेश्वर बेलखेडे यांच्याकडील गणेशोत्सव



विश्र्वकर्मानगर,भद्रावती येथील नागरिक आरती करताना



भद्रावती येथील दीपक मधुकर निकुरे यांच्याकडील गणेशोत्सव



राधाकृष्ण कॉलनी भद्रावती येथील रामदास मत्ते यांच्याकडील गणेशोत्सव



सौ.मनीषा जोशी बोरिवली यांच्या कडील गणेशोस्तव



अंबादेवी वार्ड, वरोरा येथील निवासी डॉ. मृणाल विलास पिदूरकर यांच्याकडील गणेशोत्सव



शास्त्रीनगर भद्रावती येथील केशव गैनवार यांच्याकडील गणेशोत्सव



सुरक्षानगर, भद्रावती येथील मंगेश रोकडे यांच्याकडील गणेशोत्सव

### मक्ता गावच्या विकासाकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष

# विकासाची कामे न केल्यास आंदोलन करण्याचा अनीता पोटे यांचा इशारा

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

गोंडपिपरी तालुक्यात विकासाच्या नावाखाली केवळ काही गावांना निधी दिल्या जात आहे.मात्र ज्या गावात अदयापही विकास झाला नाही त्याकरिता निधी दिला जात नाही.परिणामी गावक-यांना मोठया प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे.भंगाराम तळोधी अंतर्गत मोडणा-या मक्ता गावात विकासापासून कोसो दुर असून ग्रामपंचायतीचे याकडे पुरते दुर्लक्ष होत आहे.यामुळे प्रशासनाने मक्ता गावाच्या विकासाकरिता निधी दयावा अन्यथा आंदोलन करू असा इशारा ग्रामपंचायत सदस्य अनीता काशीनाथ पोटे यांनी दिला आहे.



मागास व दुर्गम म्हणून तालुक्याची ओळख अदयापही मिटलेली नाही.भंगाराम तळोधी ग्रामपंचायत अंतर्गत भं.तळोधीसह पिपरपेठ,भंगारपेठ,चेकतळोधी फुल्लोरा हेटी व मक्ता या गावांचा समावेश होतो.ग्रामपंचायतीवर सध्या भाजप नेते अमर बोडलावार यांच्या पॅनलची सत्ता आहे.पिपरपेठ,भंगारपेठ,चेकतळोधी फुल्लोरा हेटी या गावात विकासकामासाठी विविध प्रकारचा निधी दिल्या जात आहे.मात्र विकासापासून कोसो दुर असलेल्या मक्ता गावाच्या विकासाकडे ग्रामपंचायतीचे पुरते दुर्लक्ष होत आहे.हेतूपूरस्परपणे हा सारा प्रकार सुरू असल्याने ग्रामपंचायत सदस्य अनीता पोटे यांनी या मुददयाला घेत संताप व्यक्त केला.गावात रस्ते नाहीत.नाल्या नाहीत यामुळे गावक-यांना त्रास सहन करावा लागत आहे.नाल्याअभावी सांडपाण्याचे नियोजन नसल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.वारंवार मागणी करूनही भंगाराम तळोधी ग्रामपंचायतीचे या महत्वाच्या समस्यकडे पुर्णपणे हेतूपूरस्पर दुर्लक्ष होत आहे.गेल्या तिस ते चाळीस वर्षापासून मक्ता गावात रस्त्याची नालीची समस्या असून आता हे काम होणे आवश्यक झाले आहे.यामुळे कुठल्याही स्थितीत मक्ता गावांना विकासकामे करावी अन्यथा आपणाला आंदोलन करण्याचा निर्णय घ्यावा लागेल असा इशारा ग्रामपंचायत सदस्य अनीता काशीनाथ पोटे यांनी दिला आहे.भंगाराम तळोधी ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षीत भुमिकेमूळे मक्तावासियांतही संताप आहे.

# वढोलीत पोषण आहार प्रदर्शनी उत्साहात साजरी




**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

कुपोषण हा भारताला झालेला एक आजार आहे.या आजारातून मुक्त होण्याकरिता पोषण आहाराची गरज असते.गर्भवती स्त्रियांनी आपले होणारे मुल हे शारीरिक दृष्ट्या सबळ, विकसित होण्याकरिता काय उपाययोजना केल्या पाहिजेत या संदर्भात माहिती करिता आता शासन प्रशासनामार्फत अनेक स्तरावरून जनजागृती होत आहे.बाल विकास सेवा योजना गोंडपिपरीच्या वतीने नुकतच गर्भवती,स्तनादा महिलांसाठी समूपदेशन कार्यक्रम पोषण-आहार जनजागृती व वृक्ष वाटप कार्यक्रम घेण्यात आला.सोबतच पोषण आहार प्रदर्शनी आयोजित करण्यात आली. त्यात कट धान्य ,फळभाज्या, रानभाज्या,प्रोटीन युक्त आहार ठेवण्यात आले.यावेळी तालुका बाल विकास प्रकल्प अधिकारी शरद पारखी,पर्यवेक्षिका नैना डोईजड,अंगणवाडी सेविका अंजना झाडे,मोहिनी कानकाटे,वंदना नामेवार,शीतल लांबाडे,आशा वर्कर छबु आरेकर,रश्मी कुळमेथे,उपसरपंच बहिणाबाई देवाडे यांची उपस्थिती होती

# वढोलीत सर्पमित्रांनी दिले अजगराला जीवदान



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

वढोली-बोरगाव मार्गावरील वैभव पिंपळशेंडे यांच्या शेतात मजूर काम करत असताना दि.(२७) बुधवरो सकाळी ९ वाजता मजुरांना एक मोठा अजगर दिसला.त्यानंतर शेतमालक वैभव पिंपळशेंडे यांनी गोंडपिपरी येथील सर्पमित्रांना पाचारण करत वन विभागाला माहिती दिली. त्यानंतर सर्प मित्रांनी अजगराला पकडून जीवदान देत वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या समक्ष निसर्गाच्या सानिध्यात सोडून जीवदान दिले.यावेळी सर्पमित्र मयूर खरबनकर यांनी अजगराला जीवदान दिल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत..

# सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची निराधारांसाठी मुख्यमंत्र्यांना भावनिक साद

## ना.मुनगंटीवार यांची संजय गांधी निराधार योजनेचा निधी तात्काळ वितरित करण्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यातील लाखो निराधारांना राज्य सरकारच्या संजय गांधी निराधार योजनेचा आधार आहे. पण गेल्या काही महिन्यांपासून या योजनेची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही. त्यामुळे हातावर पोट असलेले आणि या योजनेच्या पेन्शनमधून उदरनिर्वाह चालविणारे लाखो लाभार्थी प्रतीक्षेत आहेत. आपण अतिशय संवेदनशील मुख्यमंत्री असल्यामुळे तळागाळातील लोकांच्या वेदना आपण जाणता. त्यामुळे संजय गांधी निराधार योजनेची रक्कम तातडीने वितरित करण्याचे निर्देश देऊन निराधारांना





दिलासा द्यावा, अशी भावनिक साद राज्याचे वने व सांस्कृतिक कार्य मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे घातली आहे.'राज्यातील निराधार, वृद्ध, अंध, अपंग, शारीरिक, मानसिक आजाराने ग्रस्त, विधवा, घटस्फोटीत महिलांना अर्थसहाय्य देण्याच्या मूळ हेतूने १९८० पासून संजय गांधी निराधार योजना सुरू आहे. महाराष्ट्रात या योजनेची मासिक रक्कम गेल्या काही महिन्यांपासून लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही. यामध्ये विशेषत्वाने ग्रामीण भागातील लाभार्थी आहेत. त्यांचा उदरनिर्वाह केवळ संजय गांधी निराधार योजनेच्या आधारावर आहे. अश्या लाभार्थ्यांवर उपासमारीचे संकट येऊ नये, यासाठी आपण लक्ष्य द्याल असा मला पूर्ण विश्वास आहे,' असेही ना. मुनगंटीवार यांनी पत्रात नमूद केले आहे.

'राज्यात दहा लाखांपेक्षा अधिक लोक या योजनेचे लाभार्थी आहेत. सध्या सण-उत्सव प्रारंभ झाले आहेत. अशात सर्वत्र उत्साह असताना या आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तीच्या वाट्याला मात्र प्रतीक्षा येत असेल तर लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला नक्कीच तात्काळ मार्ग काढणे क्रमप्राप्त आहे. या महत्त्वाच्या विषयाकडे आपण लक्ष देऊन, संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने तात्काळ निधी वितरित करण्याचे निर्देश द्यावे,' अशी मागणी ना. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे केली आहे.

# दिव्यांगांच्या पुनर्वसनात गडचिरोली जिल्हा देशात आदर्श करा:ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू

## 'दिव्यांगांच्या दारी' अभियानाला उत्स्पुर्त प्रतिसाद





**गडचिरोली । प्रतिनिधी**

दिव्यांग बांधवांच्या अडीअडचणी जाणून घेऊन शासकीय योजनांचा लाभ त्यांच्या घरापर्यंत पोहचविण्यासाठी राज्यात 'दिव्यांगांच्या दारी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. आज गडचिरोली जिल्हा प्रशासन दिव्यांगांपर्यंत आले आहे, ही परिवर्तनाची लाट आहे. राज्याच्या टोकावर असलेल्या अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात दिव्यांग बांधवांचे उत्तम पुनर्वसन केले तर हा जिल्हा देशात आदर्श ठरू शकतो, व त्याचे अनुकरण इतर जिल्हे करू शकतील, अशी अपेक्षा दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे अध्यक्ष ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू (मंत्री दर्जा) यांनी व्यक्त केली.

जिल्हा प्रशासन व दिव्यांग कल्याण विभागामार्फत संस्कृती लॉन येथे आयोजित 'दिव्यांगांच्या दारी' अभियानात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर आमदार डॉ. देवराव होळी, कृष्णा गजबे, जिल्हाधिकारी संजय मिना, मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह, अतिरिक्त जिल्हाधिकारी धनाजी पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रमोद खंडाते, सहाय्यक आयुक्त डॉ. सचिन मडावी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार, शेखर शेलार, फरेंद्र कुत्तीरकर आदी उपस्थित होते. दुर्गम आणि नक्षलग्रस्त असलेल्या गडचिरोलीमध्ये जिल्हा प्रशासनाचे काम उत्तम आहे, असे सांगून बच्चू कडू (मंत्री दर्जा) म्हणाले, दिव्यांग बाळ जन्माला येऊ नये, आलेच तर त्याचे प्रमाण कमी असले पाहिजे आणि दिव्यांग असलाच तर त्याचे उत्तम पुनर्वसन करण्याची सुरवात गडचिरोलीतून झाली पाहिजे. जेणेकरून इतर जिल्हे गडचिरोलीचा आदर्श घेतील. यासाठी प्रशासनाला तीन-चार टप्प्यात काम करावे लागेल. ग्रामीण स्तरावर काम करणारे तलाठी, ग्रामसेवक, कोतवाल, मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक आदींची कार्यशाळा घ्यावी. जेणेकरून पुनर्वसनाबाबत त्यांना प्रशिक्षित करता येईल. दिव्यांगांसाठी मुलभूत सोयीसुविधा अतिशय महत्वाच्या असतात, या सुविधा त्यांच्या घरापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. पुढे कडू म्हणाले, दिव्यांगांचे दु:ख पर्वताऐवढे आहे. त्यांच्यासाठी केवळ सहानुभूती नव्हे तर प्रामाणिकपणे काम करणे गरजेचे आहे. १५ वर्षांपासून आपण दिव्यांगांसाठी लढा देत आहोत. याच लढ्यातून ८२ शासन निर्णय शासनाला काढावे लागले. दिव्यांगांसाठी भरपूर योजना आहेत. घरकुल आणि शौचालय ही प्राथमिक गरज पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने गांभिर्याने लक्ष द्यावे. विकासाचे तोरण प्रत्येक दिव्यांगांच्या घरापर्यंत पोहचले पाहिजे, यादृष्टीने नियोजन करावे. दिव्यांग मंत्रालय स्थापन होणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य आहे. दिव्यांगांसाठी विविध फंडमधून ५ टक्के निधी केवळ आपल्याच राज्यात खर्च केला जातो. भविष्यात दिव्यांगांसाठी स्वतंत्र घरकूल योजना आणण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. दिव्यांग बांधवांची सेवा हे आपले कर्तव्य आहे, असे समजून सर्वांनी काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी बच्चू कडू यांनी दिव्यांग बांधवांजवळ जावून त्यांच्याशी संवाद साधला व त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या. सुरवातीपासूनच दिव्यांग बांधवांसाठी आवाज उठविणा-या बच्चू कडू यांच्यामुळेच दिव्यांग मंत्रालय स्थापन झाले आहे. जिल्ह्यातील दिव्यांगांची परिस्थिती पाहण्यासाठी ते आज गडचिरोलीमध्ये आले आहेत. शासन आणि प्रशासन दिव्यांगांच्या योग्य पुनर्वसनासाठी प्रयत्नशील असून महसूल आणि जिल्हा परिषदेप्रमाणेच पोलिस विभागही दादालोरा खिडकीच्या माध्यमातून दिव्यांगांपर्यंत मदत पोहचवित आहे. मात्र दिव्यांग बाळ जन्माला येऊ नये, यासाठी आरोग्य विभागाने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. यासाठी नियमित आरोग्य तपासणी आणि प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. स्पर्धेच्या युगात उंच भरारी घेण्यासाठी दिव्यांग बांधव आणि विद्यार्थ्यांनी स्वत:चा आत्मविश्वास वाढवावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. 'शासन आपल्या दारी' या संकल्पनेवर 'दिव्यांगांच्या दारी' हे अभियान राबविण्यात येत आहे. दिव्यांग प्रमाणपत्रापासून कोणताही लाभार्थी वंचित राहू नये, यासाठी जिल्हा प्रशासनाकडून उत्तम नियोजन करण्यात आले आहे. दर गुरुवारी जिल्हा मुख्यालयी प्रमाणपत्रांचे वाटप केले जाते. सध्या सेवा पंधरवडा सुरू असून या कालावधीत जास्तीत जास्त दिव्यांगांना लाभ देण्यात यावा. सद्यस्थितीत दिव्यांग बांधवांना दरमहा १५०० रुपये मानधन मिळते, हे मानधन २ हजार रुपये करण्यात यावे, अशी मागणी आमदार डॉ. देवराव होळी यांनी केली. तसेच दिव्यांगांना घरकुलाचा लाभ प्राधान्याने द्यावा. विशेष म्हणजे शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग बांधवांनी नोंदणी करावी, असे डॉ. होळी म्हणाले. प्रास्ताविक करतांना जिल्हाधिकारी संजय मिना म्हणाले, गडचिरोली जिल्ह्यात जवळपास २४ हजार दिव्यांग बांधव असून यापैकी २१६०० ग्रामीण भागात तर जवळपास २५०० शहरी भागात आहेत. यापैकी ८० टक्के दिव्यांग बांधवांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे, तर युडीआयडी कार्डचे १०० टक्के वाटप करण्यासाठी प्रशासनाने नियोजन केले आहे. गडचिरोली हा भौगोलिकदृष्ट्या अतिशय मोठा जिल्हा आहे. दिव्यांग बांधवांना सोयीसुविधा पुरविण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबध्द आहे. दिव्यांगांची प्राथमिक आरोग्य तपासणी आणि प्रमाणपत्रांच्या वाटपासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. दिव्यांगांची नोंदणी, त्यांच्या आरोग्य विषयक समस्या, शैक्षणिक मार्गदर्शन आणि रोजगाराची उपलब्धता यासाठी जिल्हा प्रशासन तत्पर असल्याचेही जिल्हाधिकारी श्री. मिना यांनी सांगितले. तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, ग्रॅहम बेल व डॉ. हेलन केलर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. तसेच दिव्यांगांसाठी असलेल्या विविध योजनांच्या माहितीपुस्तिकेचे यावेळी विमोचन करण्यात आले.असे आहेत लाभ मिळालेले लाभार्थी : श्वेता कोवे, डॉ. किर्तीकुमार उईके, उत्तरा देव्हारे, पारसमणी म्हशाखेत्री, शेषनाथ भैसारे, जितेंद्र लाडे, नैना वालदे, मोरेश्वर नैताम, अंजिरा पेंदाम, हेमराज कोकोडे, दामोधर मेश्राम, रमेश कन्नाके, तरकडू करकाडे, रामदास अम्मावार, नागोजी उसेंडी, विठ्ठल जुमनाके, रमा पोटावी, गंगासु पोरेटी, घनश्याम सयाम, शुभम भैसारे, संगिता तुमडे यांच्यासह आदींना विविध योजनांचा लाभ देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाधिकारी संजय मिना यांनी केले. संचालन प्रा. यादव गहाणे यांनी तर आभार उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार यांनी मानले. कार्यक्रमाला विविध विभागाचे अधिकारी, दिव्यांगांसाठी काम करणा-या संस्थांचे प्रतिनिधी तसेच दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ध्येयवेड्या सोहमचे ना.सुधीर मुनगंटीवार यांनी केले कौतुक

## ना.मुनगंटीवार यांनी आवडीच्या विषयाची पुस्तके दिली भेट



**आनंद गगनात मावेना**

चक्क राज्याच्या वने व सांस्कृतिक मंत्री यांनी आपल्या पाठीवर कौतुकाची थाप दिली आणि एवढेच नव्हे तर आपल्या आवडीची पुस्तकेही भेट दिली हा अनुभव घेताना सोहम उईकेचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. यावेळी सोहमच्या कुटुंबियांनी ना. सुधीर मुनगंटीवार यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

'नव्या पिढीमध्ये काहीतरी करून दाखविण्याची जिद्द निर्माण करायची असेल, तर त्यांच्या गुणांचे कौतुक केले पाहिजे', या तत्वावर विश्वास ठेवणारे राज्याचे वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी अलीकडेच पुन्हा एकदा त्याची प्रचिती दिली. एका व्हिडियोमुळे संपूर्ण राज्यात लोकप्रिय झालेल्या ध्येयवेड्या सोहम उईके याच्या गुणांचे कौतुक करताना त्याला खास पुस्तकांची भेटही दिली.

पोंभूर्णा तालुक्यातील डोंगरहळदी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणारा सोहम उईके याने अलीकडेच ना. मुनगंटीवार यांची भेट घेतली. सोहम आठव्या वर्गाचा विद्यार्थी असून त्याला आयएएस व्हायचे आहे. खरेतर सगळीच मुले बालपणी काही स्वप्न बघत असतात. पण ते स्वप्न गाठण्यासाठी काय करायचे असते, याची माहिती मुलांना नसते. सोहम उईके याला अपवाद आहे. तो आठव्या वर्गात असला तरीही आयएएस होण्यासाठी काय गरजेचे आहे, याचे ज्ञान त्याला आहे.काही दिवसांपूर्वी त्याने आयएएस होण्याची जिद्द पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्याकडे बोलून दाखवली होती. त्यांनी त्याच्यासोबत झालेल्या गप्पांचा व्हिडियो सोशल मिडियावर शेअर केला आणि सोहमची जिद्द बघता बघता सर्वदूर व्हायरल झाली. ना. सुधीर मुनगंटीवार यांच्यापर्यंतही ही त्याची माहिती आली. दरम्यान, सोहमच ना.मुनगंटीवार यांच्या भेटीला आला. दोघांमध्ये चांगल्या गप्पा रंगल्या. या गप्पांमधून ना. मुनगंटीवार यांनी सोहमचे आवडते विषय जाणून घेतले. त्यात सोहमने इतिहास, राज्यशास्त्र व भुगोलाची आवड असल्याचे सांगीतले आणि खास करून, इतिहास हा विषय अधिक आवडतो असे सांगितले. त्यानंतर लगेच त्याच्या आवडीच्या विषयांची पुस्तके ना. श्री. मुनगंटीवार यांनी सोहमला भेट दिली. यावेळी प्रदेश महामंत्री महिला मोर्चा अल्का आत्राम, ज्योती बुरांडे माजी उपसभापती, धनराज सातपुते उपसरपंच,सोहमचे मामा उपस्थित होते.

# आत्मनिर्भर भारतासाठी राष्ट्रीय सेवा योजना एक साधन–प्रा.श्रीकांत पाटील

**वरोरा । प्रतिनिधी**

येथील लोकमान्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोध कुमार सिग हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष,प्रा. श्रीकांत पाटील होते.



महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये चारित्र्यसंपन्नता, स्वावलंबन आणि सामाजिक बांधिलकी इत्यादी गुणांची रुजवणूक व्हावी या उद्देशाने २४ सप्टेंबर १९६९ ला राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्थापना करण्यात आली.दरवर्षी २४ सप्टेंबर हा दिवस राष्ट्रीय सेवा योजना दिवस म्हणून साजरा केला जातो.या कार्यक्रमाच्या आयोजनानिमित्त बोलतांना प्रा. श्रीकांत पाटील म्हणाले की, आत्मनिर्भर भारतासाठी स्वावलंबन आवश्यक आहे.प्रत्येकानी स्वावलंबी होण्याच्या प्रयत्न करीत असताना रोजगाराभिमुख कौशल्य विकसित करण्याची आवश्यकता आहे.हे रोजगाराभिमूख कौशल्य विकसित करण्यात म्हणजे आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीत राष्ट्रीय सेवा योजना साधन ठरू शकते

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुबोध कुमार सिग यांनी अध्यक्षीय समारोपातून युवकांच्या व्यक्तिमत्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान या विषयावर मत मांडले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.भाविका घाटे यांनी केले. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी,डॉ. तानाजी माने यांनी केले.तर आभार कु. सोनाली पाटील यांनी मानले.या कार्यक्रमाची सांगता उठे समाज के लिए उठे या लक्षगीताने झाली.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचे सहकार्य मिळाले.




सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .